**प्रेसनोट** दि. १६/०७/२०२५

ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून मंडल अधिकारी, शिवणे सर्कल ता. मावळ जि. पुणे यांचेवर व सर्कल कार्यालयातील खाजगी इसमावर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | भोसरी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, पिंपरी – चिंचवड आयुक्तालय |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४६ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) मारुती महादेव चोरमले वय-५३ वर्ष,पद मंडल अधिकारी शिवणे, ता.मावळ, पुणे. (वर्ग ३)<br>२) जयेश बाळासाहेब बारमुख, वय ३३ वर्ष, रा.मु.पो.चांदखेड ता.मावळ जि. पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- (दोन लाख) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | २,००,०००/- (दोन लाख) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | आलोसे क्र. १ यांनी २,००,०००/- (दोन लाख) रुपये व<br>आरोपी क्र. २ यांनी फोन पे द्वारे १०,०००/- (दहा हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | १४/०७/२०२५ व दि. १५/०७/२०२५ |
| सापळा दिनांक | १५/०७/२०२५ |
| ठिकाण | ऍकॉर्ड हास्पीटलच्या समोर, स्वाईन रोड, भोसरी, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९८८१८७३३३०) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची बहीण आणि इतर २१ लोकांनी मिळून सन २०१८ व २०१९ मध्ये बिल्डर नामे श्री.पूर्णचंद्र सनातन स्वाईन यांना १ कोटी ९० लाख रुपये देऊन त्याच्याकडून मौजे मावळ कुसगाव येथील गट नंबर २०९ मधील ३८ गुंठ्याचे क्षेत्र विकसन करारनामा करून घेतले आहे. नमूद क्षेत्राचा विकसन करारनामा झाला असताना सुद्धा बिल्डर श्री. पूर्णचंद्र सनातन स्वाईन यांनी त्या २२ लोकांची फसवणूक करून ते क्षेत्र दुस-या व्यक्तीला खरेदीखत करून देऊन विकले. त्या ३८ गुंठ्याची खरेदीखत केल्यानंतर त्या व्यक्तीने त्या क्षेत्राची सातबारा उता-यावर नोंद होण्यासाठी संबंधित तलाठ्याकडे अर्ज दाखल केला. त्या अर्जावर संबंधित तलाठयाने त्या व्यक्तीचा फेरफार नोंद करून तो फेरफार मंजुरीसाठी लोकसेवक क्र. १ श्री मारुती चोरमले, मंडल अधिकारी यांच्याकडे पाठवला, त्यावेळी तक्रारदाराची बहीण व इतर २१ लोकांनी तो फेरफार मंजूर न होण्यासाठी हरकत घेतली. त्याप्रमाणे लोकसेवक क्र.१ श्री. मारुती चोरमले यांनी हरकतीच्या अर्जावर सुनावणी चालू केली. त्यादरम्यान तक्रारदाराची बहीण व इतर २१ लोकांनी तक्रारदाराला अधिकारपत्र देऊन त्यांच्या नावे पॉवर ऑफ ॲटर्नी लिहून दिली. त्याप्रमाणे तक्रारदार हे लोकसेवक क्र. १ श्री. चोरमले यांच्याकडे दाखल हरकतीच्या प्रत्येक सुनावणीच्या वेळी हजर राहू लागले.

नवीन झालेला फेरफार रद्द करण्यासाठी तसेच ते ३८ गुंठ्याचे वादग्रस्त क्षेत्र तक्रारदाराची बहीण व इतर २१ लोकांच्या नावावर होण्यास मदत करण्यासाठी यातील लोकसेवक क्र.१ श्री.मारुती चोरमले यांनी तक्रारदाराकडे २ लाख रुपयांच्या लाचेची मागणी करून पुढील कामासाठी त्यांच्या ऑफिसमध्ये काम करणारा खाजगी इसम क्र. २ श्री. जयेश बारमुख यास भेटण्यास सांगितले असता त्याने सुद्धा तक्रारदाराकडे मंडल अधिकारी श्री. मारुती चोरमले यांच्यासाठी २ लाख रुपये व त्याच्यासाठी वेगळे पैसे द्यावे लागतील अशी लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी दि. १४/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १४/७/२०२५ व दि. १५/७/२०२५ रोजी वरील दोन्ही आरोपीकडे पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, दोघांनीही तक्रारदाराकडे त्यांचे वरील नमुद कामासाठी २ लाख रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दि. १५/७/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक क्र. १ श्री. मारुती चोरमले, मंडल अधिकारी यांनी तक्रारदाराच्या वरील कामासाठी तक्रारदाराकडून पंचासमक्ष २,००,००० (दोन लाख) रुपये ऍकॉर्ड हास्पीटलच्या समोर, स्वाईन रोड, भोसरी, पुणे येथे स्वीकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. तसेच खाजगी इसम क्र. २ श्री. जयेश बारमुख यांनी स्वतःकरीता तक्रारदाराकडून १०,०००/- रुपये फोन पे द्वारे पंचासमक्ष स्वीकारले आहेत. त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

Scanned with CamScanner

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

16/7/25

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो.आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो

Scanned with CamScanner